(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**२०२३ एससीसी ऑन लाईन एससी ४०८**

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

(न्यायमूर्ती व्ही. रामासुब्रमण्यन आणि पंकज मिथल यांच्या समक्ष )

दिवाणी अपील क्रमांक /२०२३

(विशेष अनुमति याचिका (दि.) क्रमांक (अनेक) १३३३-१३३५/२०२२ पासून उद्भवणारी)

जॉली जॉर्ज आणि इतर ..........अपीलकर्ते

विरुद्ध

जॉर्ज एलियास अँड एसोसिएट्स आणि इतर ..........उत्तरवादी (अनेक)

सोबत

दिवाणी अपील क्रमांक /२०२३

(विशेष अनुमति याचिका (दि.) क्रमांक ४८२२/२०२२ पासून उद्भवणारी)

दिवाणी अपील क्रमांक /२०२३ (विशेष अनुमति याचिका (दि.) क्रमांक (अनेक) १३३३-१३३५/२०२२ पासून उद्भवणारी) आणि दिवाणी अपील क्रमांक /२०२३ (विशेष अनुमति याचिका (दि.) क्रमांक ४८२२/२०२२ पासून उद्भवणारी)

निर्णयाची दिनांक : १२ एप्रिल २०२३

या प्रकरणात हजर राहिलेल्या अधिवक्त्यांची नावे :

याचिकाकर्ता(अनेक) तर्फे : मेसर्स के. एम. एन. पी. लॉ एओआर, **एओआर**

सुश्री उत्तरा बब्बर, अधिवक्ता

श्री. व्ही. श्यामोहन, अधिवक्ता

सुश्री अंशिका बाजपेयी, अधिवक्ता

श्री. मार्टिन जी. जॉर्ज, अधिवक्ता

श्री. के. परमेश्वर, **एओआर**

श्री. हरीश वासुदेवम, अधिवक्ता

सुश्री आरती गुप्ता, अधिवक्ता

सुश्री कांती, अधिवक्ता

उत्तरवादी (अनेक) तर्फे : मेसर्स के. एम. एन. पी. लॉ  एओआर, **एओआर**

श्री. कुरियाकोस वर्गीस, अधिवक्ता

श्री. व्ही. श्यामोहन, अधिवक्ता

सुश्री अंशिका बाजपेयी, अधिवक्ता

श्री. मार्टिन जी. जॉर्ज, अधिवक्ता

श्री. सी. के. ससी, **एओआर**

श्री. अब्दुल्ला नसीह व्ही. टी, अधिवक्ता

सुश्री मीना के. पौलोस, अधिवक्ता

मेसर्स लॉफिक, **एओआर**

श्री. एम. एस. विष्णु शंकर, अधिवक्ता

श्री. श्रीराम परक्कट, अधिवक्ता

श्री. कोशी जॉन, अधिवक्ता

सुश्री अथिरा जी. नायर, अधिवक्ता

श्री. श्रीनाथ एस, अधिवक्ता

श्री. आदिथ्या संतोष, अधिवक्ता

श्री. जोगी स्कारिया, **एओआर**

श्री. जोगी स्कारिया, अधिवक्ता

सुश्री बीना विक्टर, अधिवक्ता

श्री. विवेक गुरुप्रसाद बल्लेकेरे, अधिवक्ता

श्री. कीर्थीप्रियन ई, अधिवक्ता

सुश्री एम. प्रिया, अधिवक्ता

सुश्री वर्षा अवाना, अधिवक्ता

श्री. के. परमेश्वर, ए. ओ. आर

श्री. हरीश वासुदेवन, अधिवक्ता

सुश्री आरती गुप्ता, अधिवक्ता

सुश्री कांती, अधिवक्ता

**न्यायमूर्ती व्ही. रामासुब्रमण्यन** यांनी दिलेले न्यायनिर्णय :- परवानगी दिली.

**२.** जॉर्ज एलियास अँड एसोसिएट्स, जे तीन अपीलांच्या पहिल्या संचामध्ये उत्तरवादी क्र. १ आहेत आणि जे चौथ्या अपील मध्ये अपीलार्थी आहे, त्यांनी एर्नाकुलम येथील उच्च न्यायालयाच्या फाईलवर रिट याचिका (दि) क्र. (अनेक) १०३८१ आणि १७९२०/२०२० अशा दोन रिट याचिका दाखल केल्या, ज्यामध्ये अनुक्रमे (i) कल्लूरकड ग्रामपंचायत समितीने त्यांना हॉट मिक्स प्लांट स्थापन करण्यासाठी परवाना देण्यास नकार दिल्याचा आदेश बाजूला ठेवण्यासाठी आणि (ii) केरळ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग सुलभीकरण अधिनियम, २०१९[१] अंतर्गत देण्यात आलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे, पंचायतीच्या परवान्यासह सर्व परवाने आणि मंजुरी प्राप्त झाल्याचे मानले जावे, या घोषणेसाठी प्रार्थना केली आहे.

**३.** दिनांक १८.०३.२०२१ रोजीच्या समान आदेशाद्वारे, केरळ उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी केरळ पंचायत इमारत नियमावली, २०१९[२] च्या नियम ६८ अंतर्गत रिट याचिकाकर्त्यांना दोन आठवड्यांच्या आत परवानगीसाठी अर्ज करण्यास परवानगी देऊन पुढे पंचायत सचिवांना, जर पंचायतीने काही शर्ती लादायच्या असतील, त्या शर्तींच्या अधीन राहून आवश्यक परवानगी देण्याचे निर्देश देऊन दोन्ही रिट याचिका निकाली काढल्या. विद्वान न्यायाधीशांनी असे मत व्यक्त केले की, रिट याचिकाकर्त्यांनी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमती घेतली असल्यामुळे पंचायत सचिव हे नियमावली, २०१९ च्या नियम ६८ अन्वये परवानगी नाकारू शकत नाही, तथापि तो सर्वसाधारण अटी लादू शकतो.

**४.** विद्वान न्यायाधीशाच्या या आदेशाला आव्हान देणाऱ्या तीन आंतर-न्यायालयीन अपील दाखल करण्यात आल्या. त्यामधील एक आंतर-न्यायालयीन अपील रिट याचिकाकर्त्यांनी स्वतः निकालाशी असमाधानी असल्यामुळे दाखल केली होती. इतर रिट

अपील, परिसरातील काही लोकांनी दाखल केले होते, ज्यांनी हॉट मिक्स प्लांटच्या स्थापनेवर आक्षेप घेतला.

**५.** दिनांक ०९.१२.२०२१ रोजीच्या समान आदेशाद्वारे केरळ उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने सदर अपील खारीज केल्या, त्यामुळे परिसरातील लोकांनी केरळ उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने तीन आंतर-न्यायालयीन अपिलांमध्ये पारित केलेल्या आदेशाला आव्हान देणाऱ्या पहिल्या तीन अपील दाखल केल्या आहेत. उच्च न्यायालयाकडून पूर्ण दिलासा न मिळाल्याने व्यथित होऊन रिट याचिकाकर्त्यांनी सुद्धा एक अपील दाखल केली आहे, जी चौथ्या क्रमांकावर आहे.

**६.** आम्ही सर्व पक्षकारांच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान अधिवक्त्याचे म्हणणे ऐकले आहे.

**७.** जर आपण या विवादाला कारणीभूत असलेल्या संक्षिप्त तथ्यांवर नजर टाकली, तर या अपिलांमध्ये ज्या वादाचे निराकरण करायचे आहे, तो वाद अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतला जाऊ शकतो. ही संक्षिप्त तथ्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

(i) जॉर्ज एलियास अँड एसोसिएट्स, ज्यांना आपण रिट याचिकाकर्ते म्हणून संबोधित करणार आहोत, ते केरळ राज्यातील विविध भागात रस्त्यांची कामे करण्याच्या व्यवसायात गुंतलेले आहेत. रस्त्याची कामे पार पाडण्यासाठी त्यांनी हॉट मिक्स प्लांट्स खरेदी केले ज्यासाठी त्यांना कंत्राट मिळाले.

(ii) दिनांक ०६.०३.२०१९ रोजीच्या करारनाम्याद्वारे, रिट याचिकाकर्त्यांना चेरथला अरूरकुट्टी येथील रस्त्यांच्या कामाचे कंत्राट देण्यात आले. काही महिन्यांतच, केरळ एमएसएमई कायदा लागू झाला आणि त्यामुळे रिट याचिकाकर्त्यांनी उक्त कायद्याच्या कलम ५ अंतर्गत कबुली प्रमाणपत्र म्हणून ओळखले जाणारे प्रमाणपत्र प्राप्त केले.

(iii) रिट याचिकाकर्त्यांनी, हॉट मिक्स प्लांट बसविण्यास परवाना मिळणेसाठी कल्लूरकड पंचायतीला अर्जसुद्धा सादर केला. सदर अर्ज दिनांक ०५.०२. २०२० रोजी सादर करण्यात आला होता.

(iv) दिनांक ०४.०३.२०२० रोजी केरळ राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने "स्थापन करण्यास संमती" दिली.

(v) परवान्यासाठीच्या अर्जाला पंचायतीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, रिट याचिकाकर्त्यांनी केरळ पंचायत राज (कारखाने, व्यापार, उद्योजकीय उपक्रम आणि इतर सेवांना परवाना देणे) नियमावली, १९९६ च्या नियम १२(३) अंतर्गत मानीव तरतुदीचा लाभ घेण्याचा दावा केला. तदनुसार रिट याचिकाकर्त्यांनी हॉट मिक्स प्लांट बसविण्यासाठी लागणारी उपकरणे त्या मालमत्तेच्या ठिकाणी नेली, जेथून ते चालविण्याचा त्यांनी प्रस्ताव दिला होता.

(vi) काही राजकीय पक्षांशी निष्ठा असलेल्या परिसरातील काही सदस्यांनी आक्षेप नोंदवले होते, ज्यामुळे समेटाची बैठक झाली. तथापि, दिनांक १२.०५.२०२० रोजीच्या आदेशाद्वारे ग्राम पंचायतीने सदर अर्ज फेटाळला.

(vii)म्हणून रिट याचिकाकर्त्यांनी, दिनांक १२.०५.२०२० रोजीच्या आदेशाला आव्हान देणारी पहिली रिट याचिका (दि) क्र. १०३८१/२०२० दाखल केली. रिट याचिका स्वीकारल्या गेल्या आणि ग्रामपंचायतीच्या आदेशाच्या अंमलबजावणीला अंतरिम स्थगितीही देण्यात आली.

(viii) त्यानंतर, काही रिट याचिका दाखल करण्यात आल्या, ज्यांचा तपशील येथे नोंदवण्याची गरज भासणार नाही. हे सांगणे पुरेसे आहे की, रिट याचिकांपैकी एकामध्ये, उच्च न्यायालयाने प्रदूषण नियंत्रण मंडळाची संमती घेतल्यानंतर, रिट याचिकाकर्त्यांना प्लांट उभारण्यासाठी पोलिस संरक्षण दिले.

(ix) अखेरीस, रिट याचिकाकर्त्यांनी दुसरी रिट याचिका दाखल करून, केरळ एमएसएमई कायद्यांतर्गत मिळालेल्या कबुली प्रमाणपत्रानुसार, केरळ पंचायती राज कायदा, १९९४[३] अंतर्गत परवान्याची आवश्यकता नसल्याची घोषणा करण्याची मागणी केली.

(x) विद्वान एकल न्यायाधीशांनी, केरळ एमएसएमई अधिनियमाच्या अधिभावी परिणामाशी संबंधित प्रश्नावर प्रत्यक्षात न जाता असे मत व्यक्त केले की, रिट याचिकाकर्त्यांचा हॉट मिक्स प्लांट एक सुवाह्य उपकरण आहे आणि तो २०१९ च्या नियमावलींतर्गत "इमारत" या शब्दाच्या व्याख्येत येत नाही. विद्वान एकल न्यायाधीशांनी असेही मत व्यक्त केले की, प्रदूषण नियंत्रण मंडळाने "स्थापन

करण्यास संमती" दिल्यानंतर पंचायतीची परवानगी केवळ औपचारिक होती. या मताला द्विसदस्यीय खंडपीठाने सुद्धा दुजोरा दिला होता. म्हणूनच पक्षकार या न्यायालयासमोर आले आहेत.

८. विद्वान एकल न्यायाधीश आणि द्विसदस्यीय खंडपीठाच्या आदेशाचे केवळ वाचन केल्यास असे दिसून येईल की, सर्वात महत्त्वाचा पैलू नजरेआड झाला आहे. हे मान्य आहे की, रिट याचिकाकर्त्यांनी केरळ राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून स्थापन करण्यास संमती घेतली आहे. हे देखील मान्य केले जाते की, रिट याचिकाकर्त्यांनी केरळ एमएसएमई कायद्याच्या कलम ५(३) अंतर्गत कबुली प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. केरळ एमएसएमई कायद्याचे कलम ६ पुढील प्रमाणे वाचावे :-

> "६. कबुली प्रमाणपत्राचा परिणाम - (१) कलम ५ अंतर्गत जारी केलेले कबुली प्रमाणपत्र, सर्व उद्देशांसाठी कलम २ च्या खंड (क) मध्ये परिभाषित केलेल्या संमतीप्रमाणे ते जारी केल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी प्रभावी असेल आणि तीन वर्षांच्या या कालावधीच्या समाप्तीनंतर, अशा उपक्रमाला अशा समाप्तीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, कलम २ च्या खंड (क) मध्ये परिभाषित केल्यानुसार आवश्यक संमती घ्यावी लागेल :
>
> परंतु, कबुली प्रमाणपत्र एखाद्या व्यक्तीला केरळ भातशेती आणि पाणथळ जागा संवर्धन कायदा, २००८ (२००८ चा २८) मधील तरतुदींच्या विरुद्ध जमीन वापरण्याचा हक्क देणार नाही आणि केरळ शहर आणि प्रदेश नियोजन कायदा, २०१६ (२०१६ चा ९) अंतर्गत अधिसूचित मुख्य योजनेमध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या वापराविरुद्ध अयोग्य पद्धतीने जमिनीचा वापर करण्याचा हक्क सुद्धा एखाद्या व्यक्तीला राहणार नाही, जेथे अशी योजना लागू आहे.
>
> (२) उपकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या तीन वर्षांच्या कालावधीत, कोणताही सक्षम अधिकारी कलम २ च्या खंड (क) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे कोणत्याही मंजुरीच्या उद्देशाने किंवा तिच्या संदर्भात कोणतेही निरीक्षण करणार नाही."

**९.** वर नमूद केलेल्या कलम ६ (१) वरून असे दिसून येते की, कबुली प्रमाणपत्र हे कलम २(क) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे मान्यता असल्यासारखे प्रभावी असेल. कलम २(क) पुढीलप्रमाणे आहे :-

> " २(क) "मंजुरी" म्हणजे राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या स्थापनेच्या किंवा संचालनाच्या संबंधात कोणत्याही राज्य कायद्याखाली आवश्यक असलेले परवाने, परवानग्या, मंजुरी, निपटारा, नोंदणी, संमती, ना हरकत प्रमाणपत्र आणि यासारखे".

**१०.** आज रिट याचिकाकर्त्यांच्या विरुद्ध जे आहे ते म्हणजे १९९४ च्या कायद्यानुसार परवानगीची आवश्यकता आहे. परंतु केरळ एमएसएमई कायद्याचे कलम १० हे केवळ इतर कायद्यांची पायमल्ली करत नाही, तर १९९४ च्या कायद्याचा विशिष्ट संदर्भ देखील देते. केरळ एमएसएमई कायद्याचे कलम १० पुढीलप्रमाणे आहे :-

> "१०. या कायद्यामुळे इतर कायद्यांची पायमल्ली - (१) या कायद्याच्या तरतुदींचा, इतर कोणत्याही कायद्यात याच्याशी विसंगत काहीही असले तरी, सध्या अंमलात असलेल्या काळासाठी, अधिभावी प्रभाव असेल.
>
> (२) विशेषतः आणि या कायद्याच्या पूर्वगामी तरतुदींच्या सामान्यतेचा पूर्वग्रह न ठेवता, अशा तरतुदी खालील अधिनियमांमध्ये असंगत काहीही असले तरी प्रभावी ठरतील आणि या कायद्यातील तरतुदी या कायद्याच्या तरतुदींच्या अनुषंगाने सुधारित केल्याप्रमाणे वाचल्या जातील, म्हणजेः-
>
> १. केरळ पंचायती राज कायदा, १९९४ (१९९४ चा १३)
>
> २. केरळ नगरपालिका कायदा, १९९४ (१९९४ चा २०)
>
> ३. केरळ दुकाने आणि व्यावसायिक आस्थापना कायदा, १९६० (१९६० चा ३४)
>
> ४. केरळ लिफ्ट अँड एस्केलेटर्स कायदा, २०१३ (२०१३ चा १८)
>
> ५. त्रावणकोर-कोचीन सार्वजनिक आरोग्य कायदा, १९५५ (१९५५ चा XVI )
>
> ६. मद्रास सार्वजनिक आरोग्य कायदा, १९३९ (१९३९ चा ३ )

**११.** त्यामुळे, रिट याचिकाकर्त्यांनी त्यांच्या दुसऱ्या रिट याचिकेत केलेली विनंती, सांविधिक आदेश या दृष्टीने स्पष्टपणे मंजूर होण्यास पात्र होती. परंतु दुर्दैवाने, विद्वान एकल न्यायाधीश आणि द्विसदस्यीय खंडपीठ या दोघांनीही या सर्वात महत्त्वाच्या पैलूकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले.

**१२.** तथापि, आक्षेपकांची बाजू मांडणारे विद्वान वकील के. परमेश्वर यांनी असा युक्तिवाद केला की, विचारार्थ घेण्यासाठी दोन मुद्दे उद्भवतात, म्हणजे (१) केरळ एमएसएमई कायद्यांतर्गत उत्तरवादी क्रमांक १ ने प्राप्त केलेले स्वयं-प्रमाणीकरण हॉट मिक्स प्लांट उभारण्यासाठी पुरेसे आहे काय; आणि (२) अशा स्वयंप्रमाणनाच्या मदतीने, १९९४ च्या कायद्यांतर्गत आणि २०१९ च्या नियमांनुसार पंचायतीच्या परवानगीची आवश्यकता नाही काय ?

**१३.** आक्षेपकर्त्यांच्या विद्वान वकिलानुसार, केरळ सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग सुविधा नियमावली, २०२० च्या नियम ३ मध्ये, कलम ५(३) अंतर्गत कबुली प्रमाणपत्र मिळवू इच्छिणाऱ्या सर्व व्यक्तींनी फॉर्म-१ मध्ये योग्यरित्या भरलेले स्वयं-प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. या अर्जामध्ये अर्जदाराकडून केरळ पंचायत इमारत नियम, २०१९ चे पालन करण्याची हमी दिलेली असते आणि म्हणूनच असा युक्तिवाद केला आहे की, रिट याचिकाकर्ते स्थानिक पंचायतीच्या परवानगीची आवश्यकता टाळू शकत नाहीत.

**१४.** परंतु कायद्यांतर्गत तयार केलेले नियम सांविधिक तरतुदींचा प्रभाव रद्द करू शकत नाहीत अशा साध्या कारणासाठी हा युक्तिवाद कायम ठेवला जाऊ शकत नाही. केरळ एमएसएमई कायद्याच्या कलम १०(२) मध्ये हे स्पष्ट केले आहे की, १९९४ च्या कायद्यातील तरतुदी केरळ एमएसएमई कायद्याच्या तरतुदींनुसार सुधारित केल्या जातील. त्यामुळे, कायद्याच्या तरतुदींचा प्रभाव रद्द करण्यासाठी आक्षेपकर्ता नियमांपासून मागे हटू शकत नाहीत.

**१५.** विद्वान अधिवक्ता श्री. के. परमेश्वर यांनी असा युक्तिवाद केला आहे की, केरळ एमएसएमई कायद्याच्या कलम १० च्या राज्यघटनात्मक वैधतेला त्यांच्या पक्षकारांनी आव्हान दिले नसले तरी हे न्यायालय लोकहितासाठी अधिभावी आणि निरपेक्ष प्रभाव असलेल्या खंडांची संक्षिप्त व्याख्या करू शकते. विद्वान अधिवक्त्यानुसार, पर्यावरणाच्या प्रदूषणापासून

आपल्या अधिकारिता असलेल्या क्षेत्रांचे आणि व्यक्तींचे संरक्षण करणे हे पंचायतीचे सार्वजनिक कर्तव्य आहे आणि सावधगिरीचे तत्त्व लागू करणे आवश्यक आहे. विद्वान अधिवक्त्याने बृहन्मुंबई महानगरपालिका (एम.सी.जी.एम) – विरुद्ध-अभिलाष लाल [४] आणि ए. पी. प्रदूषण नियंत्रण मंडळ- विरुद्ध- प्रा.एम. व्ही. नायुडू (निवृत्त) [५] या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयावर विश्वास दर्शविला आहे.

**१६.** परंतु वरील युक्तिवादाबद्दल पूर्णपणे गैरसमज झालेला आहे. केरळ एमएसएमई कायद्याचे कलम १० हा पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६, वायू प्रदूषण (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९८१, पाणी (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण), १९७४ यासारख्या कोणत्याही प्रदूषण नियंत्रण कायद्यातील तरतुदींची पायमल्ली करीत नाही. केरळ एमएसएमई कायदा हा १९९४ चा कायदा आणि इतर काही स्थानिक कायद्यांची पायमल्ली करतो. म्हणूनच रिट याचिकाकर्त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून 'संमती' घेतली आहे. एकदा प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमती घेतली की, पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उद्देशाने केरळ एमएसएमई कायद्याच्या कलम १० ची संक्षिप्त व्याख्या करण्याची गरज उद्भवत नाही.

**१७.** पंचायत ही मूलभूत संस्था असल्याने तिला निर्णय घेण्यात सहभागी होण्याचा अधिकार आहे, हा युक्तिवाद पुन्हा चुकीचा समजला जातो. सर्व पंचायतींना मोटारीयोग्य रस्ते हवे आहेत. पण जर त्यांना त्यांच्या पंचायतीत रस्ते बांधणी साहित्य तयार करायचे नसेल, तर हे साहित्य कुठून आयात करता येईल हे आम्हाला माहीत नाही. त्यामुळे, टी. एन. गोडावर्मन थिरुमुलपद-विरुद्ध-युनियन ऑफ इंडिया[६] मधील लाफार्ज उमियम माइनिंग प्रायव्हेट लिमिटेड मधील या न्यायालयाच्या निर्णयावर आक्षेपकर्त्यांच्या विद्वान अधिवक्त्यांनी दर्शविलेले विश्वास देखील चुकीचे आहे.

**१८.** खरे तर, हॉट मिक्स प्लांट सुवाह्य आहे की ती तात्पुरती किंवा कायमस्वरूपी रचना आहे इत्यादी, या प्रश्नावरही युक्तिवाद करण्यात आले होते. परंतु आम्हाला असे वाटत नाही की या प्रश्नाच्या खोलवर जाणे आवश्यक आहे, कारण केरळ एमएसएमई कायद्यांतर्गत प्राप्त केलेले कबुली प्रमाणपत्र हे केवळ याचिकाकर्त्याच्या बाजूने मुद्दा मांडण्यासाठी पुरेसे आहे.

**१९.** वरील बाबी लक्षात घेता, रिट याचिकाकर्ता जो यापैकी तीन अपीलांमध्ये उत्तरवादी क्र. १ आणि यापैकी एका अपीलमध्ये अपीलकर्ता आहे, तो दोन्ही रिट याचिकांमध्ये

मागितलेल्या दिलास्याच्या हक्कदार आहे. तदनुसार, रिट याचिकाकर्ता जॉर्ज एलियास अँड असोसिएट्स यांनी दाखल केलेले अपील मंजूर करण्यात येते, आक्षेपित आदेश बाजूला ठेवले जातात आणि जॉर्ज एलियास अँड असोसिएट्स यांनी दाखल केलेल्या रिट याचिका मंजूर करण्यात येते. आक्षेपकर्त्यांनी, म्हणजे परिसरातील लोकांनी दाखल केलेले अपील फेटाळले जातात. खर्चाबाबत कोणतेही आदेश दिले जात नाही.

---

<u>न्यायनिर्णयांची यादी</u>

१. थोडक्यात, "केरळ एमएसएमई कायदा"

२. थोडक्यात, "२०१९ च्या नियमावली"

३. थोडक्यात, "१९९४ चा कायदा"

४. (२०२०) १३ एससीसी २३४

५. (१९९९) २ एससीसी ७१८

६. (२०११) ७ एससीसी ३३८

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X - X